**नियमित दिवाणी दावा क्र. ३४९/२०१६**
**निशाणी क्र.७८ लगत**

**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे विद्वान विधिज्ञ श्री.डी.व्ही.जोशी यांचे मार्फत सुरु</u> :-**

मी अडीच वर्षांपुर्वी सेवानिवृत्त झालेलो आहे. सध्या मी अहमदनगर येथे राहतो. परीरक्षण भुमापक म्हणुन मोजणी झाली तेव्हा मी कार्यरत होतो. सन २००४ पासुन मला शेतजमिनीची मोजणी करण्याचा अनुभव आहे. हे म्हणणे खरे आहे की, शेतजमीनीची मोजणी सर्व्हे मॅन्युअलप्रमाणे करावी लागते. ज्या शेतजमीनीची मोजणी करावी लागते त्या जमीनीच्या लगतच्या कब्जेदारांनाही नोटीस काढावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, लगतचे कब्जेदार मोजणी कामी हजर असणे आवश्यक असते. आज माझ्याकडे नकाशाची अ प्रत सोबत आहे. माझ्यासोबतच्या नकाशाच्या अ प्रतीवरुन मला गट क्रमांक २७३ च्या लगतच चार कब्जेदारांची नावे सांगता येणार नाही. नकाशामध्ये गट क्र.२७३ च्या चारही बाजुंचे गट क्रमांक नमुद केलेले आहेत. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्या जमिनी व संपुर्ण सर्व्हे क्रमांक मोजुन वादीचा गट क्र.२७३ ची बांधहदद निश्चिती करण्याचा आदेश होता. मोजणी करण्यापुर्वी न्यायालयाचा निशाणी क्र.१३ कडील आदेश मी वाचला होता. न्यायालयाने लगतच्या जमिनी मोजण्याचा आदेश केला नव्हता. न्यायालयाचा इंग्रजी भाषेतील नि.क्र.१३ वरील आदेश मी वरीष्ठांकडुन समजून घेतला. साक्षीदार परत सांगतो आदेश मराठीत आहे. न्यायालयाने लगतच्या जमिनी मोजण्याचा आदेश मला केला होता. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे काम करणे माझवर बंधनकारक आहे. गट क्र.२७३ च्या लगतच्या जमिनींची मोजणी न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मी केलेली आहे. गट क्र.२७३ च्या दक्षिणेला गट क्र.२७९ आहे. गट क्र.२७९ च्या चार बाजुंच्या खुणा नकाशात दाखविलेल्या नाहीत. अ आलेखाप्रमाणे गट क्र.२७९ चे क्षेत्र मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, बांधहददीच्या खुणा इंग्रजी अदयाक्षरे ओ, एन याप्रमाणे ठरविल्या जातात. हे म्हणणे खरे आहे की, अ आलेखानुसार नकाशामध्ये कोणत्याही जमिनीच्या बांधहददीच्या खुणा इंग्रजी ओ,एन या अक्षरांनी मी दाखविलेल्या नाहीत. गट क्र.२७३ च्या पश्चिमेला गट क्र.२८४ आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.२७३ ला लागुन गट क्र.२८४ आहे. अ आलेखाप्रमाणे गट क्र. २८४ च्या चारही बाजु नकाशात दाखविलेल्या नाहीत. त्यानुसार गट क्र.२८४ चे किती

क्षेत्रफळ आहे नकाशा पाहुन सांगता येणार नाही. गट क्र.२८४ च्या चारही बाजुच्या बांधाच्या खुणा ओ, एन या अक्षराने दाखविलेल्या नाहीत. गट क्र.२७३ च्या उत्तरेस गट क्र.२७४ आहे. नकाशावर गट क्र.२७४ चे एकुण क्षेत्र नमुद केले नसल्याने सांगता येणार नाही. अ आलेखामध्ये गट क्र.२७४ च्या चारही बाजुच्या बांधाच्या खुना ओ, एन या अक्षराने दाखविलेल्या नाहीत. गट क्र.२७३ च्या पुर्वेस रस्ता आहे. सदरचा रस्ता सरकारी आहे. या रस्त्याची नेमकी लांबी व रूंदी मला सांगता येणार नाही. या रस्त्याची मोजणी मी केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, हा रस्ता उत्तर-दक्षिण आहे. सदरचा रस्ता हा सरकारी असल्याबाबत गावठाण अभिलेख पाहुन तशी मी खात्री केली. पुर्वेकडील रस्ता हा कोणत्या गटातुन गेला आहे याची खात्री मी केली होती.

प्रश्न- गट क्र.२७३ च्या पुर्वेकडील उत्तर- दक्षिण चारीचा रस्ता हा कोणकोण्त्या गटातुन गेला आहे.

उत्तर- हा रस्ता गट क्र.२७३ व गट क्र.२७४ च्या बाहेरून गेला आहे.

हा रस्ता कोणत्या जमिनीतुन गेला ते मी पाहिले होते. साक्षीदार परत सांगतो की, हा रस्ता शिव रस्ता आहे. सदरचा रस्ता सरकारी नाही. गाव नकाशामध्ये हा रस्ता सरकारी असल्याचे दाखविलेले नाही. गाव नकाशा पाहुन मी नेमकी काय खात्री केली ते मला सांगता येणार नाही. गट क्र.२७३ च्या केवळ दक्षिणबाजुचा गट क्रमांक मी मोजलेला आहे. गट क्र.२७३ च्या उत्तर व पश्चिम बाजुचा गट मी मोजलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.२७३ ची मोजणी करण्यासाठी त्याच्या उत्तर व पश्चिम बाजुचा गट मोजण्याची मला आवश्यकता वाटली नाही. मोजणी मी न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, न्यायालयाने लगतचे सर्व गट मोजण्याचा आदेश देवुनही मला त्याची मोजणी करणे गरजेचे वाटले नाही. हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयाचा आदेश पाहिलाच पाहिजे असे बंधन माझ्यावर नाही. न्यायालयास लगतचे सर्व गट मोजण्याची मला आवश्यकता वाटत नाही असे लेखी कळविले नव्हते. उपअधिक्षक, भुमि अभिलेख, राहाता यांनी न्यायालयात अहवाल पाठविला. माझा अभिलेख पाहुन तसा अहवाल दिला. मी मोजणी अहवाला उपअधिक्षक, भुमी अभिलेख, राहाता यांना दिला. न्यायालयाचा आदेश असुनही गट क्र.२७३ च्या तीन बाजुंची मोजणी मी केली नाही असे उप अधिक्षक, भुमी अभिलेख, राहाता यांनी मी लेखी

कळविले नव्हते.  हे म्हणणे खरे नाही की, न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मोजणी झालेली नाही. गट क्र.२७३, २७४, २७९ व २८४ यांचे सातबारा उतारे मी पाहिलेले आहेत. निशाणी क्र.०८ चे गट क्र.२७३ च्या सातबारा उता-यावरील सर्वांना मोजणीकामी  नोटीसा पाठविल्या होत्या. उपअधिक्षक, भूमी अभिलेख, राहाता श्री.काळे यांच्यामार्फत नोटीसा गेल्या. नोटीसीवर श्री. काळे यांची सही आहे. गट क्र.२७३ च्या सातबारा उता-यावरील सर्व भुधारकांना मोजणीकामी नोटीसी पाठविल्याचा लेखी पुरावा माझयाकडे आहे. व पुरावा न्यायालयामध्ये दाखल केला. मोजणीकामी सर्व भूधारकांना नोटीसा पाठविल्याचे अभिलेख माझयाकडे नाही. गट क्र.२७४ च्या सातबारा उता-याप्रमाणे सर्व भूधारकांना मोजणीच्या नोटीसा पाठविल्याचा अभिलेख माझयाकडे नाही. गट क्र.२७९ च्या सातबारा उता-याप्रमाणे सर्व भूधारकांना मोजणीच्या नोटीसा पाठविल्याचा अभिलेख माझयाकडे नाही. शिव रस्ता सरकारच्या मालकीचा असतो. सरकारचे प्रतिनीधी म्हणुन शिव रस्ता मोजणी कामी सरकारला मी नोटीस पाठविली नाही. सर्व्हे मॅन्युअलप्रमाणे मोजणीच्या आधी १५ दिवस नोटीस पाठवावी लागते. या प्रकरणातील मोजणीची तारीख २३.०५.२०१७ अशी होती. १५ दिवस आधी नोटीसा पाठविल्याचा अभिलेख माझयाकडे नाही. मोजणीकामी कार्यालयीन आदेश मला दि.१४.०३.२०१८ रोजी प्राप्त झाला. कार्यालयात माझयासोबत भूकरमापक लक्ष्मण वाकळे कार्यरत होता.

**मध्यान्नाची वेळ झाल्याने पुढील उलटतपास तहकुब..**

श्रवणोत्तर  स्वीकृत,

सही/-

दिनांक :- १३/०६/२०२४

(ए. ए. कुलकर्णी)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
राहाता